आनंद काही आकाशातून पडत नाही,
माणसांच्या कृतिउक्तींतूनच तो जन्म घेतो.
माणसांना याचे भान असावे लागते, एवढेच.

सुवासाप्रमाणे पसरण्याची वृत्ती असते आनंदाची
जन्मताच सारे वातावरण बदलून टाकतो तो
माणसांना याचे भान असावे लागते एवढेच.

दुःख हलके आणि सुख बोलके करतो आनंद
आनंद हसायला शिकवतो साऱ्या माणसांना
माणसांना याचे भान असावे लागते एवढेच.

आनंदाला भान असते माणसांच्या गरजांचे
आनंदाला ठाऊक असते मन कसे फुलवायचे
आनंद आनंदात असतो तो आपल्यासाठी एवढेच!

१६.१.२०१९

---